सन २०१७-१८ टंचाई अंतर्गत मौजे खर्डी, तालुका शहापूर, जिल्हा ठाणे येथील पुरक नळ पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. ३७/पापु १४
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ५ मार्च, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ३.२.१९९९

२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६

३) विभागीय आयुक्त, कोकण यांचे क्रमांक जा.क्र. मशा/टंचाई/कार्या-६/कावि-९०७६/२०१८, दिनांक २७.०२.२०१८ चे पत्र.

४) शासन पत्र क्रमांक बैठक २०१७/प्र.क्र. १७० /पापु १४, दिनांक १ मार्च, २०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना :-

विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी तातडीच्या पाणी पुरवठा योजनेंतर्गत मौजे खर्डी, ता. शहापूर, जिल्हा ठाणे येथील पुरक नळ पाणी पुरवठा योजनेचा रुपये २,०८,३६,२८७/- किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक ०१.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक ०१.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी मौजे खर्डी, तालुका शहापुर, जिल्हा-ठाणे येथील पुरक नळ पाणी पुरवठा योजनेला प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ३ च्या पत्रासोबत शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावात नमुद मौजे खर्डी, तालुका शहापूर, जिल्हा ठाणे या पुरक नळ पाणी पुरवठा योजनेच्या रुपये २,०८,३६,२८७ (रुपये दोन कोटी, आठ लाख, छत्तीस हजार, दोनशे सत्याऐंशी फक्त) किंमतीच्या प्रस्तावास स्थायी समितीने दिनांक ०१.०३.२०१८ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने या आदेशान्वये मौजे खर्डी, तालुका शहापूर, जिल्हा ठाणे या पुरक नळ पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी मौजे खर्डी, ता. शहापूर या गावांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्वप्रथम घोषित करावे.

२) सदर प्रस्तावात नमूद केलेली पूरक पाणी पुरवठा योजना कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांचेमार्फत राबविण्यात यावी.

३) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

४) योजनेची निविदा अल्प मुदतीची (७ दिवस) काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

५) निविदा प्रक्रीया दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीया दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

६) योजनेची कामे दिनांक ३० एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे. तथापि, या दिनांकापर्यंत योजनेतून पाणी पुरवठा सुरु न झाल्यास योजनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

७) प्रस्तुत योजनेसाठी आवश्यक ती वन विभागाची परवानगी तातडीने प्राप्त करुन घेणे आवश्यक राहिल.

८) सदर योजनेची प्रस्तावात नमूद केलेली कामे जिल्हा परिषद,ठाणे मार्फत पूर्ण करण्यात आल्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती व योजनेचे व्यवस्थापन संबंधित ग्रामपंचायत मार्फत करणे आवश्यक राहील.

९) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

१०) योजना जरी प्रती माणसी ४० लिटर दरडोई दर दिवशी या प्रमाणे संकल्पीत करण्यात आली असली तरी टंचाई कालावधीत पंपींग तास कमी करुन गावांस दरमाणशी दर दिवशी २० लिटर याप्रमाणे पाणी पुरवठा करण्यात यावा.

११) प्रस्तुत उपाययोजनेसाठी वापरण्यात आलेले फ्लोटींग पंप (Floating Pump) व पाईप्स धरणातील पाणीसाठा संपूष्टात आल्यानंतर अथवा टंचाई कालावधीनंतर या उपाययोजनेचा वापर होणार नसेल तर सदर पंप व पाईप्स काढून ठेवून अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांच्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन आवश्यकतेनुसार पुढील टंचाई कालावधीत त्यांचा वापर याच ठिकाणी अथवा अन्य ठिकाणी करणे शक्य होईल.

१२) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१- अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (अनिवार्य) (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ०१ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०३११०४०२६१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh
Bhagwan
Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.03.05 17:18:58 +05'30'

(महेश सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
८. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई
९. जिल्हाधिकारी, ठाणे
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
११. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
१२. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
१३. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,ठाणे
१४. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१५. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६. पापु १४ (निवडनस्ती)